# स्तोत्र - चिंतन

बायबलमध्ये जे स्तोत्रसंहिता नावाचे पुस्तक आहे त्या पुस्तकात १५० स्तोत्रे आहेत. ती स्तोत्रे एकीकडे प्रभुशब्द आहेत तर दुसरीकडे भक्तांच्या प्रार्थना आहेत. स्तोत्रांचे पठण केल्यामुळे एकाच वेळी माणूस परमेश्वराशी बोलतो आणि परमेश्वरदेखील माणसाशी बोलतो.

या "प्रभूशब्द" वर्षात आपण प्रत्येक आठवड्याला एक अशा प्रकारे पुढील तीन वर्षांमध्ये ह्या १५० स्तोत्रांचे चिंतन करणार आहोत. "सुवार्ता" मासिकामध्ये गेले दीड वर्ष 'स्तोत्रांचे अध्यात्म" ह्या सदराखाली स्तोत्रावर लेखन करणारे जीवन दर्शन केंद्राचे संचालक व बायबलचे गाढे अभ्यासक फा.(डॉ.) रॉबर्ट डिसोजा हे आपल्यासाठी स्तोत्र-चिंतन लिहिणार आहेत. "प्रतिमा"च्या वाचकांच्या वतीने व पर्यायाने आपल्या धर्मग्रामातील प्रत्येक कुटुंबाच्या वतीने आम्ही त्यांचे आभार मानतो व स्वागत करतो.

# स्तोत्र-चिंतनाची पध्दत

**- फा.(डॉ.) रॉबर्ट डिसोजा**

आजपासून आपण स्तोत्र-चिंतनाला सुरुवात करणार आहोत. कौटुंबिक प्रार्थनेमध्ये ह्या स्तोत्र-चिंतनाचा समावेश करताना पुढीलप्रमाणे करावे :

१. प्रथम संपूर्ण स्तोत्र सावकाश व प्रार्थनापूर्वक वाचावे.
२. एक मिनिट शांतता पाळावी.
३. त्यानंतर त्यावर आधारित असलेले चिंतन वाचावे.
४. वैयक्तिक चिंतनासाठी एक मिनिट शांत राहावे.
५. त्यानंतर देण्यात आलेली प्रार्थना वाचावी.

# सज्जन आणि दुर्जन
## (स्तोत्र पहिले)

**चिंतन :** स्तोत्र १ मध्ये एकूण तीन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात सज्जन आणि दुर्जन काय करतात त्याचे वर्णन आहे. दुसऱ्या टप्प्यात त्यांच्यासाठी दोन प्रतीके वापरण्यात आली आहेत. तर तिसऱ्या टप्प्यात त्यांच्या वागण्याचा परिणाम शब्दबध्द करण्यात आलेला आहे. १) सज्जन मनुष्य परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो. तो त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करतो. दुर्जन चुकीच्या मसलतीने म्हणजे सल्ल्यानुसार चालतात. ते पापी जनांच्या मार्गाने वाटचाल करतात. त्यांना निंदकांच्या बैठकीत बसणे आवडते. २) सज्जनांसाठी पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेल्या झाडाचे प्रतीक वापरण्यात आलेले आहे. हंगामी फळ व हिरवीगार पाने हे त्यांच्या फलद्रुप व प्रसन्नचित्त जीवनाचे चिन्ह आहे. परमेश्वर त्याचे सर्व कार्य सिध्दीस नेतो.

दुर्जनासाठी भूस हे प्रतीक वापरण्यात आलेले आहे. भूस हे भाताचे रिकामे टरफल असते व ते वाऱ्यावर उडून जाते. ह्याचा अर्थ दुर्जन चचंल असतात व त्यांचे जीवन रिकामे असते. असे दुर्जन न्यायाच्या दिवशी टिकाव धरू शकणार नाहीत. ते नीतिमानांच्या मंडळीत म्हणजे देवाच्या सहवासात उभे राहू शकणार नाहीत. त्यांच्या मार्गाचा शेवट विनाश असा असतो. तर सज्जनांच्या मार्गावर परमेश्वर प्रसन्न असतो. माझ्या जीवनात दुष्टाई जास्त आहे की खरीखुरी नीतिमत्ता अधिक आहे ? *(वैयक्तिक चिंतनासाठी शांतता)*

**प्रार्थना :** हे प्रभो परमेश्वरा आम्हाला दुर्जनांपासून दूर ठेव. तुझ्या पवित्र शब्दावर मनन करण्यास आम्हाला साहाय्य कर. आमच्या जीवनाला प्रेम, शांती, आनंद, सहनशीलता, ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता आणि आत्मसंयम ही पवित्र आत्म्याची फळे येऊ देत. आम्हाला सदैव प्रसन्नचित्त ठेव. आमच्या हातचे काम सिध्दीस ने. तुझ्या पवित्र जनांमध्ये आमचा समावेश कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

# अभिषिक्त राजा
## (स्तोत्र दुसरे)

**चिंतन :** इस्त्राएलमध्ये राजांच्या कारकीर्दित एकूण ४० राजे होऊन गेले. एखाद्या राजाचा राज्याभिषेक जवळ आला की शेजारची राष्ट्रे दंगलग्रस्त परिस्थिती निर्माण करायचे. त्यांच्या सोहळ्याआड येतील अशा व्यर्थ योजना आखायचे. विशेषत: ज्यांच्यावर इस्त्राएलच्या राजाची हुकमत असायची ते आपली बंधने व पाश तोडण्याचा विचार करायचे. मात्र हा राजा साक्षात परमेश्वराचा अभिषिक्त आहे हे त्यांच्या ध्यानात येत नसे. परमेश्वराची ही योजना त्यांना कळत नसल्यामुळे "स्वर्गात जो राजासनारुढ आहे तो हसत आहे" असे स्तोत्रकार म्हणतो. राजा हा परमेश्वराचा पुत्र असल्याने पृथ्वीवरील राजांनी व न्यायाधीशांनी त्याला शरण यावे असे तो सुचवितो. प्रभू येशूच्या बाप्तिस्म्याच्यावेळी स्वर्गातून वाणी ऐकू आली. "तू माझा परमप्रिय पुत्र आहे. तुझ्याविषयी मी संतुष्ट आहे," परंतु लोकांनी येशूला परमेश्वराचा अभिषिक्त राजा म्हणून स्वीकारले नाही.

मी प्रभू येशू ख्रिस्ताला माझा वैयक्तिक तारणारा व प्रभू म्हणून स्वीकारले आहे काय? बाप्तिस्म्याद्वारे मी अभिषिक्त राजा, याजक व संदेष्टा बनलेलो आहे हेच माझ्या जीवनातून दिसून येते काय? कोणकोणत्या बाबतीत मी परमेश्वराविरुध्द व्यर्थ योजना करीत असतो ? *(वैयक्तिक चिंतनासाठी शांतता)*

**प्रार्थना :** हे सर्वसमर्थ परमेश्वरपित्या, प्रभू येशू ख्रिस्त हा तू अभिषिक्त केलेला साऱ्या विश्वाचा राजा आहे हे सत्य आमच्या मनावर बिंबव. बाप्तिस्मा साक्रामेंत स्वीकारुन आम्ही त्याच्या प्रेषितकार्यात सहभागी झालेले आहोत ह्याची दिव्य जाणीव आम्हाला नित्य असू दे. आमच्या कुटुंब प्रमुखासाठी, सेवकनेत्यांसाठी, धार्मिक आणि नागरी अधिकाऱ्यांसाठी आम्ही करीत असलेल्या प्रार्थना ऐकून घे. त्यांच्या आज्ञेत राहून आम्ही तुझ्या योजनांशी सहकार्य करावे अशी नम्र वृत्ती आम्हाला प्रदान कर. आमच्या हाती असलेला अधिकार जबाबदारवृत्तीने व सेवाभावनेने वापरण्यास आम्हाला मार्गदर्शन कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

# परमेश्वराचा आधार

(स्तोत्र तिसरे)

**चिंतन :** दावीद राजा राज्य करीत असतानाच त्याच्या मुलाने त्याच्याविरुध्द बंड पुकारले. आपला मुलगा अबशालोम ह्याच्यापुढून पळून गेल्यानंतर अशाही परिस्थितीत परमेश्वर कसा आपला आधार बनून राहतो ते दावीदाने ह्या स्तोत्रात प्रार्थनेच्या रुपात सांगितलेले आहे. स्तोत्र ३ ही दावीद राजाने सकाळच्या समयी केलेली देवावरील श्रध्दासूचक प्रार्थना आहे. आपला मुलगा आणि त्याचे सोबती आपले शत्रू बनलेले आहेत. तरीही दावीद घाबरुन जात नाही. परमेश्वर आपल्याभोवती कवच करुन उभा आहे. तो आपला आधार आहे असा विश्वास तो व्यक्त करतो. तो बिछान्यावर पडताच झोपी जातो, शिक्षापात्र ठरलेला पेत्रही तुरुंगात डाराडूर झोपी जाऊ शकतो. कारण त्याचा भरवसा प्रभूवर होता. आपल्या जीवनात विशेषत: आपल्याच लोकांकडून आपल्याला त्रास होतो तेव्हा आपण अस्वस्थ होतो की प्रभूवर भरवसा ठेवून शांतपणे झोपी जाऊ शकतो ? आत्मपरीक्षण करु या. *(वैयक्तिक चिंतनासाठी शांतता)*

**प्रार्थना :** हे प्रभो, ह्या जगातील जीवन जगत असताना तू सांगितल्याप्रमाणे आम्हाला क्लेश होतात. परंतु आम्ही भिऊ नये, धीर धरावा, कारण तू जगाला जिंकलेले आहेस. तुझा पुत्र येशू ख्रिस्त ह्याला त्याच्याच एका प्रेषिताने फसविले. तो फितूर झाला. परंतु तुझ्या पुत्राने हा दु:खाचा प्याला मनापासून प्राशन केला व आमचे तारण केले. आमच्या भौतिक व आध्यात्मिक शत्रूंपासून आमचे रक्षण कर. आम्हाला शांत झोपेचे आणि चांगल्या परिपूर्ण जीवनाचे वरदान दे. आम्हाला सदैव तुझा आधार लाभू दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू येशू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

# परमेश्वरावर भाव ठेवा
## (स्तोत्र चौथे)

**चिंतन :** आपल्याच मुलाने आपल्याविरुध्द बंड पुकारले तेव्हादेखील दावीद परमेश्वराचा आधार घेत कसा तग धरू शकला ते आपण स्तोत्र ३ मध्ये पाहिले. तिथे तो सकाळची श्रध्दासूचक प्रार्थना करतो. आताही परिस्थिती तशीच आहे. मात्र वेळ संध्याकाळची आहे. अशा प्रसंगी दावीद आलटून-पालटून आपल्या लोकांशी व परमेश्वराशी बोलतो. परमेश्वराचा धावा करीत असताना आपल्या लोकांना परमेश्वरावर भाव ठेवावा अशी विनवणी तो करतो. त्याच्या गौरवाची अप्रतिष्ठा करणारे, निरर्थक गोष्टींची आवड धरणारे आणि लबाडीची कास धरणारे ह्यांनी परमेश्वराची भीती बाळगावी, पाप करू नये. अंथरुणावर पडल्या-पडल्या स्तब्ध राहून आत्मपरीक्षण करावे असे आवाहन दावीद त्यांना करतो. मात्र अशाही परिस्थितीत दावीद अंतर्यामी आनंदी आहे कारण परमेश्वरच त्याला एकांतात निर्भय ठेवतो. आपल्या जीवनात कोणकोणत्या व्यक्ती आपल्याला अस्वस्थ वा बेचैन होण्यास कारणीभूत ठरतात ? आपल्या अंतर्यामी शांती आहे की अशांती ? आपण निर्भय बनत आहोत की दिवसेंदिवस असुरक्षित बनत आहोत ? *(वैयक्तिक चिंतनासाठी शांतता)*

**प्रार्थना :** हे स्वर्गीय पित्या, ह्या जगातील जीवन जगत असताना आमचे लक्ष विचलित होते. आम्ही तुझ्यावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत. बारीक-सारीक कारणांवरून आमच्या कुटुंबात भांडणे उत्पन्न होतात. तुझा धावा करण्याऐवजी आम्ही एकमेकांना दोष देत, "ब्लेम-गेम" खेळत राहतो. तुझ्यावर भाव ठेवण्याऐवजी आम्ही स्वतःच्या अक्कल हुशारीने प्रश्न हाताळण्याचा प्रयत्न करतो आणि मग आमच्या जीवनात निराशा येते. आमची झोप उडते. आम्हाला अंतर्यामी बलसंपन्न कर. एकमेकांना समजून घेण्यास व तू देत असलेला आनदं व शांती स्वीकारण्यास आम्हाला मनाचा मोठेपणा दे. ही प्रार्थना आम्ही तुझा पुत्र आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो. आमेन.

# संरक्षणासाठी प्रार्थना
## (स्तोत्र ५)

**चिंतन :** हे दाविदाचे वैयक्तिक विलापस्तोत्र आहे. वेळ सकाळची आहे. दाविदाचे शत्रू त्याच्याविरुध्द कुटिल कारवाया करीत आहेत. मात्र दाविदाच्या स्तोत्रांचे वैशिष्टय असे आहे की, त्या सगळ्या स्तोत्रात तो आपले लक्ष स्वत:वर किंवा इतरांवर अथवा आजूबाजूच्या परिसरावर केंद्रित करीत नाही. तर तो परमेश्वराकडे धाव घेतो. "बोलण्याकडे कान दे", "चिंतनाकडे लक्ष दे", "वाणीकडे कान दे" अशा शब्दांमधून दावीद कळकळीची विनंती करीत असल्याचे दिसून येते. "प्रात:काळी" (म्हणजे पहाटे) "सकाळी" या शब्दांद्वारे दावीद दिवसभरातील कामात परमेश्वराला पहिले प्राधान्य देतो असे दिसून येते. त्याला परमेश्वराचे मार्ग ठाऊक आहेत. दुष्टाई, दुष्टपणा, कुकर्म, असत्य भाषण, खुनी व कपटी मनुष्य, बढाई मारणारे ह्यांच्याविषयी परमेश्वराची भूमिका त्याला माहीत आहे. दावीद आपल्या ह्या सर्व शत्रूंना परमेश्वराच्या हाती सोपवितो. त्याचे शत्रू तेच परमेश्वराचे शत्रू असे त्याला वाटते. दावीदाच्या मते आता परमेश्वरानेच त्यांचा न्याय करावा. परमेश्वराच्या कृपेवर विसंबून राहाणारादावीत अशा प्रतिकूल परिस्थितीत परमेश्वराठायी हर्ष करतो त्याचा गौरव करतो. दुष्ट व्यक्ती व दुष्ट प्रवृत्ती ह्यांनी आपण कसे हाताळतो ? *(वैयक्तिक चिंतनासाठी शांतता)*

**प्रार्थना :** हे प्रभो, परमेश्वरा, या जगातील जीवन जगत असताना आम्हाला जागतिक, भौतिक, सामाजिक व आध्यात्मिक स्वरुपाच्या शत्रूंशी मुकाबला करावा लागतो. हे प्रभो, येशू ख्रिस्ता, तू क्रुसावर टांगलेला असताना आपल्या शत्रूंसाठी प्रार्थना केलीस व त्यांना क्षमा केलीस. आमच्या वैऱ्यांवर मनापासून प्रीती करण्यास आम्हाला साहाय्य कर. काम, क्रोध, मद, मोह, मत्सर, अहंकार अशा आध्यात्मिक शत्रूंपासून आमचे संरक्षण कर. आमच्या शत्रूंसाठी आम्ही करीत असलेल्या आमच्या प्रार्थना मान्य कर. आमेन.

**- फा.(डॉ.) रॉबर्ट डिसोजा**